| | | | |
|---|---|---|---|
| CNR No.: MHPU05-000028-2025 | दाखल दिनांक | – | २२/०३/२०२५ |
| | नोंदणी दिनांक | – | २९/०४/२०२५ |
| | निकाल दिनांक | – | २१/०७/२०२६ |
| | कालावधी | – | वर्षः ०१ महिनेः ०३ दिवसः ३० |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पुणे महानगर पालिका न्यायालय, जि. पुणे**
(**पिठासीन अधिकारी श्रीमती एन. एस. सय्यद**)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. २६/२०२५** **निशाणी क्रमांक:४२**

| | |
|---|---|
| फिर्यादचा तपशील | गुन्हा घडल्याची तारीख – २८/१२/२०२४<br>पुणे महानगरपालिका हद्दीतील मन्नुषाह मस्जीद ट्रस्ट, कब्रस्तान, ४८२ नाना पेठ, पुणे. |
| तक्रारकर्ता | **पुणे महानगरपालिका** तर्फे,<br>श्री. ज्ञानोबा शंकर बालवडकर वयः ५५ वर्ष<br>हॉर्ट्रीकल्चर मिस्त्री, ढोलेपाटील क्षेत्रीय कार्यालय, पुणे मनपा. |
| फिर्यादी तर्फे सादरकर्ता – | विधिज्ञ श्री. शिवाजीराव पाटील |
| आरोपी | **१. सर्फराज इकबाल चौधरी** वयः ४५ वर्ष<br>**२. नासीर अजीज शेख** वयः ४० वर्ष<br>**३. वामन हरिभाऊ कांबळे** वयः ५३ वर्ष<br>सर्व राहणारः मन्नुषाह मस्जीद ट्रस्ट, कब्रस्तान , ४८२, नाना पेठ, पुणे. |
| आरोपीकरिता/तर्फे सादरकर्ता – | विधिज्ञ श्री. आर. एस. पोटे |

| आरोपीचा अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हा ठेवल्याचा तपशील | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा केली | किती शिक्षा दिली | खटला चालू असताना आरोपी कारागृहात असल्याबाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३. | श्री. सर्फराज इकबाल चौधरी<br>श्री. नासीर अजीज शेख<br>श्री. वामन हरिभाऊ कांबळे | अटक नाही. | -- | महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८(१) सह कलम २१(१) अन्वये | निर्दोष मुक्त केले. | लागू नाही. | लागू नाही. |

## फिर्यादीतर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | नाव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | श्री. ज्ञानोबा शंकर बालवडकर (निशाणी क्र.१६) | फिर्यादी |
| २. | श्री. इकबाल मोहम्मद कासम (निशाणी क्र.२७) | साक्षीदार |
| ३. | श्री. एजाज हमीद शेख (निशाणी क्र.३५) | साक्षीदार |

## बचावपक्षातर्फे नोंदविलेल्या साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | नाव | साक्षीचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय
## (पारित दिनांक २१ जुलै, २०२६)

०१. प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८(१) सह कलम २१(१)** अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याचे आरोपांबाबत चालविणेत आला.

०२. फिर्यादी पक्षातर्फे असे कथन आहे की, उद्यान विभाग पुणे महानगरपालिका, पुणे यांना दिनांक २८/१२/२०२४ रोजी अवैध वृक्षतोडीची माहिती मिळाली. त्यानुसार फिर्यादीतर्फे श्री. ज्ञानोबा शंकर बालवडकर यांनी पुणे महानगरपालिका (येथुन पुढे संक्षिप्ततेकरिता 'पुणे मनपा' असे संबोधण्यात येईल) हद्दीतील मन्नुषाह मस्जीद ट्रस्ट, कब्रस्तान, ४८२ नाना पेठ, पुणे येथे जाऊन पाहणी केली. त्या ठिकाणी अनाधिकृतपणे विनापरवाना खालीलप्रमाणे वृक्षतोड केल्याचे निदर्शनास आले.

| **अनु. क्र.** | **झाडाचे नाव** | **मध्य वेढी (मीटर)** | **उंची (मीटर)** | **अंदाजे वय वर्षे** | **झाड/झाडांच्या फांद्या तोडल्याबाबतचे वर्णन** |
|---|---|---|---|---|---|
| १. | बुच – ६ | १.५० | ९ | १९ | प्रस्तुत प्रकरणी समक्ष जागेवर जाऊन पाहणी केली असता ५ वृक्ष संबंधितांनी जमिनीलगत पासुन विनापरवाना पुर्ण काढलेले आहेत व १ वृक्ष जमिनीलगत पासुन ३ मीटर उंची वरील संपुर्ण विस्तार विनापरवाना कमी केलेला आहे व वृक्ष मरेल असे कृत्य केलेले आहे. |

०३. फिर्यादमध्ये पुढे असे आले आहे की, फिर्यादी श्री. ज्ञानोबा शंकर बालवडकर यांनी घटनास्थळाची पाहणी केली, दिसत्या परिस्थितीचा घटनास्थळ पंचनामा (नि.१८) केला आणि त्यानुसार त्यांनी घटनास्थळाचे छायाचित्र जोडून कार्यालयास अहवाल (नि.१९) सादर केला. त्यानंतर फिर्यादी पुणे मनपाने आरोपींना वर नमुद वृक्षतोड केल्यामुळे निशाणी २० ते निशाणी २२ अशा नोटीस पाठविल्या. आरोपींनी प्रस्तुत नोटीसीस खुलाशे निशाणी २३ सादर केले परंतु सदर खुलाशे समाधानकारक नसल्यामुळे पुणे मनपाने आरोपींविरुध्द प्रस्तुतचा खटला दाखल केला.

०४. आरोपीस खटल्यात समन्स काढण्यात आल्यानंतर आरोपी खटल्यात हजर झाले. गुन्ह्याचे दोषारोप आरोपींना मराठीत समजावुन सांगितले, आरोपींना ते समजले. आरोपींनी गुन्हा कबुल केला नाही. त्यानुसार निशाणी क्र.१५ अन्वये आरोपींचे निवेदन नोंदविण्यात आले व त्याचे विनंतीवरुन सदरचा खटला आरोपींविरुध्द पुढे चालविण्यात आला.

०५. गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादीपक्षातर्फे एकुण ३ साक्षीदारांची साक्ष नोंदविली व कागदोपत्री पुरावा दाखल केला. निशाणी क्र. ३९, ४० व ४१ अन्वये आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३(१)(ब) अन्वये तपासणी घेण्यात आली. आरोपींनी त्यांचेविरुध्द सर्व बाबी नाकारल्या व ते निर्दोष असल्याचे सांगितले.

०६. उभय पक्षांचा युक्तीवाद, खटल्यातील पुरावा व इतर कागदपत्रांचा विचार करता खालील मुद्दे निर्माण होतात त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहीत नोंदवित आहे ते येणेप्रमाणेः

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | फिर्यादी पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक | |

| | | |
|---|---|---|
| | २८/१२/२०२४ अगर त्या दरम्यान पुणे महानगरपालिका हद्दीतील मन्नुषाह मस्जीद ट्रस्ट, कब्रस्तान, ४८२ नाना पेठ, पुणे येथे आरोपींनी फिर्यादमध्ये नमूद वृक्षांची विनापरवाना, अनाधिकृतरित्या तोड केली होती किंवा ते सदर वृक्षतोडीस कारणीभुत झाले होते? | नाही. |
| २. | आदेश काय ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ करिता –**

०७ आरोपींविरूध्द गुन्हा शाबीत करण्याकरिता फिर्यादी पक्षाने ही बाब शाबीत करणे आवश्यक आहे की, आरोपींनी अवैधरित्या फिर्यादमध्ये नमुद वृक्षांची विनापरवाना, अनाधिकृतरित्या तोड केली होती व ते **महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८(१) सह कलम २१(१)** चा अन्वयेच्या तरतुदीप्रमाणे आरोपी शिक्षेस पात्र आहेत. आरोपींतर्फे पुरावा देण्यात आलेला नाही.

०८. गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादीपक्षातर्फे फिर्यादी श्री. ज्ञानोबा शंकर बालवडकर, साक्षीदार श्री. मोहम्मद इकबाल कासम व श्री. एजाज हमीद शेख यांनी त्यांचे पुरावे दिलेले आहेत. याशिवाय, तक्रारी अर्ज (नि.क्र.१७), घटनास्थळ पंचनामा (नि.क्र.१८), घटनास्थळाचे छायाचीत्र, सविस्तर अहवाल (नि.क्र.१९), नोटीस (नि.क्र.२० ते २२), नोटीस खुलाशे (नि.क्र.२३), इ. कागदपत्रे दाखल केली.

०९. फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ श्री. ज्ञानोबा शंकर बालवडकर यांच्या तोंडी पुराव्यात असे आले आहे की, दिनांक ०९/१२/२०२४ रोजी ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय, पुणे मनपामध्ये हॉर्टीकल्चर मिस्त्री म्हणुन कार्यरत असताना इकबाल कासम शेख यांनी कार्यालयास लेखी तक्रारी अर्ज निशाणी १७ दिला होता. सदर तक्रार प्राप्त झाल्यानंतर घटना ठिकाणी जाऊन पाहणी केली असता, घटना ठिकाणी बुच या प्रकाराची सहा झाडे विनापरवाना तोडण्यात आलेली होती. घटनास्थळी पाहणी केल्यानंतर सदर घटनास्थळाचे छायाचीत्र काढले. त्यानुसार दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा निशाणी १८ तयार केला तसेच सदर पंचनाम्यावर त्यांची व पंचांची सही आहे. साक्षीदार पुढे कथन करतात की, नंतर त्यांनी सविस्तर अहवाल निशाणी १९ तयार केला व कार्यालयास सादर केला. त्यानंतर कार्यालयामार्फत आरोपींना दिनांक ०६/०१/२०२५, १३/०२/२०२५ व ११/०३/२०२५ रोजी नोटीस पाठविण्यात आल्या होत्या. सदर नोटीसना आरोपींनी दिनांक २०/१२/२०२४, /०५/२०२४ व दिनांक २०/०६/२०२४ रोजी उत्तर दिले होते. परंतु सदर खुलासा अमान्य असल्याने आरोपींविरुद्ध प्रस्तुतची केस दाखल करण्यात आली होती. आरोपी यांना वृक्षांची छाटनी करण्याबाबत मनपाकडुन परवानगी देण्यात आली होती परंतु परवानगी पेक्षा जास्त प्रमाणात छाटनी करण्यात आली होती. त्यामुळे आरोपींविरूद्ध प्रस्तुतची फिर्याद दाखल करण्यात आली होती.

१०. फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, दिनांक २८/१२/२०२४ रोजी तक्रार प्राप्त झालेबाबतचा उल्लेख फिर्यादमध्ये केलेला नाही. दिनांक ३०/०७/२०२४ रोजी आरोपी क्र.१ यांनी वृक्षतोडीबाबत परवानगी मिळणेबाबत पुणे महानगरपालिका यांचेकडे अर्ज सादर केलेला होता. त्याप्रमाणे दिनांक २७/०८/२०२४ रोजी पुणे मनपा यांनी आरोपी क्र.१ यांना झाडे

छाटनीसाठी परवानगी दिली होती. पुढे साक्षीदार मान्य करतात की, तक्रारदार व पंच ही एकच व्यक्ती आहे. दिनांक ०९/१२/२०२४ रोजीच्या तक्रारी अर्जामध्ये आरोपी यांना वृक्षांची उंची कमी करण्याकरीता परवानगी देण्यात आली होती हे नमूद करण्यात आलेले आहे. आरोपी यांनी तक्रारी अर्जाला देखील दिनांक १८/१२/२०२४ व २०/१२/२०२४ रोजी खुलासा सादर केलेला होता. तसेच आरोपी यांनी दिनांक १६/०१/२०२५ व १३/०२/२०२५ च्या नोटीसला देखील खुलाशे सादर केलेले होते. पुढे साक्षीदार मान्य करतात की, त्यांनी स्वतः आरोपी यांनी वृक्षतोड करत असताना पाहिलेले नाही. तसेच घटनास्थळावरून कोणताही लाकुडफाटा अगर हत्यार जप्त केलेले नाही.

११. फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.२ श्री. इकबाल मोहम्मद कासम यांच्या तोंडी पुराव्यात असे आले आहे की, श्री. बालवडकर यांनी त्यांना ढोले पाटील क्षेत्रीय कार्यालय येथे बोलावले होते त्यानंतर बालवडकर यांनी त्यांना मस्जीद जवळ बोलावले होते. दिनांक ०९/१२/२०२४ रोजी त्यांनी आरोपी यांचेविरूद्ध तक्रारी अर्ज दिलेला होता. पुढे साक्षीदार कथन करतात की, आरोपींना झाडांची १० फुटापर्यंत छाटण्याची करण्याची पुणे मनपा यांनी परवानगी दिली होती परंतु आरोपी यांनी पुर्णपणे झाडे काढून टाकले होते. तसेच आरोपी सदर झाडे तोडत असताना त्यांनी स्वतः पाहिले होते. तसेच घटनास्थळ पंचनामा करतेवेळी ते स्वतः उपस्थीत होते व ते घटनास्थळ पंचनामा वरील एक पंच देखील आहेत. घटनास्थळी ६ ते ७ झाडांची तोड झालेली होती.

१२. फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.२ यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, तक्रारी अर्ज निशाणी १७ या मध्ये आरोपींना झाडे तोडत असताना मी त्यांना पाहिले होते असे नमूद केलेले नव्हते. तसेच तक्रारी अर्ज देत असताना झाडे छाटनी

करण्याबाबत मिळालेल्या परवानगीची प्रत त्यांनी त्यासोबत दिलेली होती. नाना पेठ मस्जीद ट्रस्ट व त्यांच्या घरामध्ये सुमारे ५ मिनीटाचे अंतर आहे. सदर साक्षीदार पुढे असे मान्य करतात की, दिनांक ३०.०७.२०२४ आरोपींनी झाडांची छाटनी करण्याबाबत परवानगी करीता अर्ज सादर केला होता. दर पाच वर्षांनी मस्जीद ट्रस्टची निवडणुक होते. मागील निवडणुक सन २०२३ मध्ये झाली होती. त्यामध्ये दोन पॅनल होते. एक पॅनल लब्बेक पॅनल मधुन ते व आरोपी क्र.१ व २ उभे होते व दुसरे पॅनल कादरी पॅनल मधुन एजाज हमीद शेख हे उभे होते. सदर निवडणुकीमध्ये आरोपी क्र.१ यांना प्रथम क्रमांकावर मते मिळाले होते. सदर साक्षीदार पुढे असे मान्य करतात की, सदर ट्रस्टवर ते पुर्वी पासुन काम करत होते त्यामुळे त्यांची चेअरमन होण्याची इच्छा होती. परंतु त्यांना चेअरमन पद देण्यात आले नाही. परंतु व्हाईस चेअरमन म्हणुन ट्रस्टच्या मिटींगमध्ये त्यांची निवड झाली. ट्रस्टच्या मालकीचा एक वाडा होता त्यामध्ये ते भाडे तत्वावर राहात होते. त्यानंतर त्यांना व्हाइस चेअरमन पदावरून काढुन टाकण्यात आले. पुढे साक्षीदार मान्य करतात की, दिनांक ३१.१२.२०२४ रोजी आरोपी क्र.१ यांनी त्यांच्याविरूद्ध पोलीसांकडे तक्रारी अर्ज दिला होता त्यानुसार पोलीसांनी त्यांना चौकशी करीता देखील बोलावले होते.

१३. फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.३ श्री. एजाज हमीद शेख यांच्या तोंडी पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २८/१२/२०२४ रोजी श्री. बालवडकर यांनी मन्नुषाह मस्जीद ट्रस्ट, कब्रस्थान, नानापेठ, पुणे येथे पंचनामा करतेवेळी बोलावले होते. घटनास्थळी सुमारे ७ ते ८ वृक्ष तोडण्यात आलेले होते. पंचनामावर त्यांची व इकबाल कासम यांची पंच म्हणुन सही देखील आहे. पुढे साक्षीदार कथन करतात की, सदर वृक्षतोडीबाबत त्यांनी ढोलेपाटील क्षेत्रीय कार्यालय यांचेकडे फोटोसह तक्रार दिली होती. सदरचे फोटो त्यांनी त्यांच्या मोबाईलमध्ये काढले होते.

१४. फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र.३ यांनी त्यांच्या उलटतपासात असे मान्य केले आहे की, पंचनाम्यामध्ये त्यांचा पत्ता ४७२, नानापेठ मन्नुषाह मस्जीद जवळ असा दिलेला आहे व सदरचा पत्ता हा घटना ठिकाणाहून सुमारे १०० मीटर अंतरावर आहे. पुढे साक्षीदार मान्य करतात की, त्यांनी दिलेला पत्ता व घटनास्थळ यामध्ये दोन इमारती आहेत. तसेच सदर पत्त्यावरून घटनास्थळ दिसत नाही. त्यांच्या समक्ष फिर्यादी यांनी वृक्षतोडीसाठी वापरलेले कोणतेही साधन अगर लाकुडफाटा देखील जप्त केलेला नव्हता. निशाणी १७ वरील तक्रारी अर्जावर मागील पानावर त्यांची सही देखील आहे तसेच त्यावर सही करणारे इतर दोन तीन लोक हे कोंढवा येथे राहतात. पुढे साक्षीदार मान्य करतात की, तक्रारी अर्जासोबत परवानगी दिलेबाबत पत्र देखील जोडलेले होते. सदर मन्नुषाह मस्जीद ट्रस्ट मध्ये ते देखील ट्रस्टी आहेत.

१५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुद्ध दोषारोप सिद्धतेकामी फिर्यादीपक्षातर्फे एकुण तीन साक्षीदारांची साक्ष अभिपटलावर नोंदवण्यात आली आहे. फिर्यादीतर्फे साक्षीदाराचे तोंडी आणि लेखी पुराव्याचे अवलोकन केले. कार्यालयास प्रस्तूत प्रकरणातील अनाधिकृत वृक्षतोडीची लेखी तक्रार मिळाल्यानंतर संबंधीत विभागाचे हॉट्री मिस्त्री श्री. ज्ञानोबा शंकर बालवडकर यांनी घटनास्थळावर जावुन पाहणी केली आणि त्याबाबतचा सविस्तर अहवाल कार्यालयात सादर केला.

१६. फिर्यादीपक्षातर्फे संबंधीत विभागाचे हॉट्री मिस्त्री फिर्यादी श्री. ज्ञानोबा शंकर बालवडकर, श्री. इकबाल मोहम्मद कासम व एजाज हमीद शेख यांची साक्ष नोंदवण्यात आली. फिर्यादी यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये असे मान्य केले आहे की, आरोपी यांनी मन्नुषाह मस्जीद ट्रस्टच्या वतीने वृक्षतोडीसाठी परवानगी मागितली होती व पुणे

महानगरपालिकेतर्फे आरोपी यांना वृक्षांची छाटणी करण्यासाठी परवानगी देखील देण्यात आलेली होती. तसेच आरोपी यांना दिलेल्या नोटीसला आरोपी यांनी वेळोवेळी खुलाशे देखील सादर केलेले आहेत. साक्षीदार क्र.२ श्री. इकबाल कासम यांनी आरोपी यांना वृक्षतोड करत असताना पाहिले होते असे कथन केले असले तरी आरोपी यांनी वृक्ष छाटणी करण्याबाबत रितसर परवानगी पुणे महानगरपालिकेकडुन घेतलेली होती असे अभिलेखावरून स्पष्ट होते. साक्षीदार क्र.३ यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केल्याप्रमाणे ते देखील सदर ट्रस्ट मध्ये ट्रस्टी म्हणुन आहेत. तसेच पंचनाम्यामध्ये त्यांचा पत्ता घटनास्थळ मन्नुषाह मस्जीद ट्रस्टजवळ असा दिलेला आहे परंतु त्यांचा पत्ता घटनास्थळापासुन सुमारे १०० मीटर अंतरावर आहे व त्यांच्या पत्त्यावरुन घटनास्थळ दिसत नाही. तसेच साक्षीदार क्र.२ यांनी त्यांच्या उलटतपासात मान्य केल्याप्रमाणे आरोपी क्र.१ व त्यांच्यामध्ये वाद असलेबाबत देखील मान्य केलेले आहे. त्यामुळे सदर वादातुन तक्रारदार यांनी पुणे महानगरपालिका यांचेकडे वृक्षतोडी संदर्भात तक्रार केल्याचे नाकारता येत नाही.

१७. अभिलेखावरून असे स्पष्ट होते की, फिर्यादी यांनी फिर्यादमध्ये झाडांचे अंदाजे वर्णन लिहिलेले आहे. मुळ तक्रारदार व पंच साक्षीदार ही एकच व्यक्ती आहेत. दिनांक ३०.०७.२०२४ रोजी आरोपी यांनी वृक्ष छाटनी संदंर्भात पुणे महानगरपालिका यांचेकडे अर्ज सादर केला होता. त्याप्रमाणे दिनांक २७.०८.२०२४ रोजी पुणे महानगरपालिकेतर्फे झाडांची उंची कमी करण्याची परवानगी दिलेली होती. प्रस्तुत प्रकरणामध्ये फिर्यादी श्री. बालवडकर यांनी दिनांक ३०.१२.२०२४ रोजी कार्यालयाकडे अहवाल सादर करून विनापरवाना वृक्षतोड झाल्याची माहिती कार्यालयाला कळविली आहे असे दिसुन येते. तसेच प्रस्तुतची फिर्याद दिनांक २२.०३.२०२५ रोजी दाखल केलेली आहे. वृक्ष छाटनीची परवानगी दिनांक

२७.०८.२०२४ रोजी दिल्यानंतर अहवाल दिनांक ३०.१२.२०२४ रोजी तयार करेपर्यंत सुमारे ४ महिन्यांचा कालावधी मध्ये गेल्याचा दिसून येतो. तसेच परवानगी दिल्यानंतर नक्की किती तारखेला वृक्षांची छाटनी करण्यात आली ती तारीख देखील अभिलेखावर उपलब्ध नाही. वृक्षांची छाटनी करण्यापूर्वी वृक्षांची उंची किती होती हे देखील अभिलेखावर उपलब्ध नाही. साक्षीदार क्र.२ व ३ यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये स्पष्टपणे मान्य केले आहे की, ट्रस्टच्या निवडणुकीवरून त्यांच्यामध्ये व आरोपी क्र.१ व २ यांच्यामध्ये वाद होते. त्यामुळे सदर वादातुन प्रस्तुतची फिर्याद/मुळ तक्रारी अर्ज दाखल केला असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

१८. त्यामुळे आरोपी क्र.१ ते ३ यांनी विनापरवाना वृक्षांची छाटणी/वृक्ष तोड करून वृक्ष मरेल असे कृत्य केले हे दाखविण्याकरिता कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच प्रत्यक्ष घटनास्थळावरुन कोणताही लाकुडफाटा जप्त केलेला नाही. त्यामुळे आरोपींनी वृक्षतोड केली ही बाब फिर्यादीपक्षाने संशयाच्या पलिकडे सिध्द केलेली नाही. करिता मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदवण्यात येते.

**<u>प्रश्न क्रमांक २ करिता</u> –**

१९. फिर्यादीने कथित वेळी व स्थळी वृक्षतोड झाल्याची घटना सिध्द केली नाही. त्यामुळे सबब, आरोपी क्र.१ ते ३ निर्दोष मुक्त होणेस पात्र ठरतात, करिता न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो–

:: **<u>आदेश</u>** ::

१. आरोपी क्र.१. **सर्फराज इकबाल चौधरी,** आरोपी क्र.२. **नासीर अजीज शेख** व आरोपी क्र.३. **वामन हरिभाऊ कांबळे** यांना **भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७८**

(फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१)) नुसार त्यांच्यावर ठेवण्यात आलेल्या महाराष्ट्र नागरी क्षेत्र झाडांचे जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८(१) सह कलम २१(१) अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचा जामिन बंधपत्र किंवा जात मुचलका रद्द करण्यात येतो.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये, पुढील सहा महिन्याचे कालावधीकरिता प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चा वैयक्तिक बंधपत्र दाखल करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

SAYYAD NAJMEEN SALIMSHA
Digitally signed by SAYYAD NAJMEEN SALIMSHA
Date: 2026.07.21 15:53:23 +0530

स्थळः पुणे
दिनांकः २१/०७/२०२६.

**(श्रीमती एन. एस. सय्यद)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
(मनपा न्यायालय, पुणे), जि. पुणे.

## <u>प्रमाणपत्र</u>

मी शपथेवर सांगतो की या पी.डी.एफ न्यायनिर्णय फाईलमधील मजकुर हा मुळ न्यायनिर्णयातील मजकुराशी शब्द–न–शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| कोर्टाचे नांव | : | **श्रीमती एन. एस. सय्यद,**<br>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (मनपा न्यायालय),<br>जि. पुणे |
| लघुलेखकाचे नांव | : | श्री. सुनिल गुलाब सुर्यवंशी |
| निकाल दि. | : | २१.०७.२०२६ |
| सही केलेची दि. | : | २१.०७.२०२६ |
| अपलोड केलेची दि. | : | २१.०७.२०२६ |